सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : सीबीटी-०६२२/प्र.क्र.३४/२०२३/३१ दिनांक - ०८ फेब्रुवारी, २०२४

**- :प्रसिद्धीपत्रक:-**

**विषय :- सांख्यिकी अधिकारी, सामान्य राज्य सेवा, गट- ब, जाहिरात क्रमांक २२/२०२२ या संवर्गांच्या सुधारित उत्तरतालिका व निकालाबाबत.**

आयोगाकडुन TCS मार्फत सांख्यिकी अधिकारी, सामान्य राज्य सेवा, गट- ब, जाहिरात क्रमांक २२/२०२२ या संवर्गाची संगणक प्रणालीवर आधारित चाळणी परीक्षा दिनांक ०८ फेब्रुवारी, २०२३ रोजी घेण्यात आली होती. प्रस्तुत चाळणी परीक्षेचा सुधारीत निकाल दिनाक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी जाहिर करण्यात आला होता, तसेच प्रस्तुत चाळणी परीक्षेची सुधारीत उत्तरतालिका दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

**२.** प्रस्तुत संवर्गाच्या चाळणी परीक्षेतील प्रश्नांच्या उत्तरांवर उमेदवारांनी स्पष्टीकरण/संदर्भ देऊन पाठविलेली लेखी अभिवेदने व त्यावरील तज्ञांचे अभिप्राय विचारात घेऊन Question ID No. 630680161963 च्या उत्तराचा पर्याय १ ऐवजी २ $\left\{\frac{3\sqrt{2}}{50}\right.$ ऐवजी $\left.\frac{3\sqrt{2}}{100}\right\}$ असा बदलून प्रस्तुत संवर्गाच्या परीक्षेची उत्तरतालिका सुधारित करण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. त्यामुळे दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेला निकाल रद्द करण्यात येत असुन सुधारित उत्तरतालिकेनुसार निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सह सचिव,
दक्षता, धोरण व संशोधन,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई